# सिंधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी
## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
### दरपत्रक नोटीस

सिंधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी अंतर्गत आयोजीत मासिक आढावा सभेरिता व कार्यशाळा/ प्रशिक्षण करीता वर्ष २०२५-२६ साठी खाद्यपदार्थ पुरविणेसाठी खालील अटी व शर्तीस अनुसरुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदार्थाचे नाव | वर्णन / प्रमाण | दर |
|---|---|---|---|
| १ | चहा साधा | ७५ मिली. | |
| २ | **अल्पोपहार**<br>शिरा गोड/उपिट/कांदा पोहे /समोसा/वडा पाव/ साबू वडा/ | १५० ते २०० ग्रॅम | |
| ३ | **अल्पोपहार**<br>साबू खिचडी/इडली चटणी/ इडली सांभार /पाव भाजी /आंबोळी चटणी /मिसळ / मेंदू वडा/दही वडा / साधा डोसा / मसाला डोसा | १५० ते २०० ग्रॅम | |
| ४ | शाकाहारी जेवण साधे (मर्यादीत) | ३ चपात्या, दोन मुद भात, प्रत्येकी १ वाटी वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर | |
| ५ | शाकाहारी जेवण साधे (अमर्यादीत) | चपात्या, भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर खाईल तेवढे | |
| ६ | शाकाहारी स्पेशल जेवण (मर्यादीत) | ३ चपात्या / ५ पु-या, दोन मुद मसाला भात, प्रत्येकी १ वाटी वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम / श्रीखंड / बासुंदी / जिलेबी / रस मलाई /रस गुल्ले | |
| ७ | शाकाहारी स्पेशल जेवण (अमर्यादीत) | चपात्या / पु-या, मसाला भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम / श्रीखंड / बासुंदी / जिलेबी / रस मलाई /रस गुल्ले खाईल तेवढे | |
| ८ | चिकन जेवण (अमर्यादीत) | चपात्या, भात, सुके चिकन, चिकन रस्सा गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी | |

१) दरपत्रक विहित नमुन्यात व मुदतीत या कार्यालयाकडे पोहोचविणे आवश्यक आहे तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.

२) सिलबंद लखोटयावर खाद्यपदार्थ पुरविणेसाठी दरपत्रक असा उल्लेख असावा-

३) दरपत्रक सोबत,

अ)GST क्रमांक झेरॉक्स प्रत, GST क्रमांक लागू नसल्यास व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र,

ब)अन्न व औषध प्रशासनाचा दाखला

क)पॅनकार्ड झेरॉक्स प्रत द्यावी (बचत गट असल्यास बचत गटाच्या नावाने पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.)

Scanned with OKEN Scanner

४) दरपत्रकामधील दर सर्व करांसहीत नमूद करावेत. तसेच नमुद केलेले दर प्रति नग असावेत

५) अन्न पदार्थ तयार करणे, पदार्थ वाढणेसाठी आवश्यक भांडी इत्यादी याचीव्यवस्था पुरवठादारानेच करावयाची आहेत. तसेच जेवण / नाष्टयानंतरची त्याठिकाणची साफसफाई पुरवठादाराने करावयाची आहे.

६) सर्व अन्नपदार्थांचा दर्जा व चव उत्तम असावी. तसेच सर्व पदार्थ ताजे असावेत. गरम अन्नपदार्थ वाढणेसाठी प्लास्टीकचा वापर करु नये

७) कोणतीही एक किवा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार राखून ठेवला आहे.

८) उपस्थिती पत्रकाच्या नोंदीवरुन जेवण/चहा/नाष्टाचे देयक पी.एफ.एम.एस.व्दारे अथवा एन.ई.एफ.टी व्दारे अदा केले जाईल.

९) पुरवठादाराने दरपत्रक देतेवेळी कोणतीही अट घालावयाची नाही.

१०) ज्या पुरवठादाराची दरपत्रक मंजूर केली आहे त्यांनी वरील सर्व अटींचे पालन न केल्यास कोणतीही सूचना न देता मक्ता रद्द करण्यात येईल.

११) दरपत्रक नामंजूर झाल्यास त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२) मंजूर दरपत्रक धारकास वरील अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा रु.१००/- च्या बॉण्डपेपरवर करुन द्यावा लागेल .

सदरची दरपत्रके सिलंबंद लखोटयात दिनांक 26/०५/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यत पोस्टाने किंवा प्रत्यक्ष जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे आणून देणेची आहेत. सदरची दरपत्रके शक्यतो त्याच दिवशी किंवा सुटटी असल्यास दुस-या दिवशी उघडण्यात येतील.

जा.क्र.सिंजिप/आवि/एनएचएम/97 /२०२५-२६
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी दिनांक - 20/०५/२०२५

(डॉ.सई रुपेश धुरी)
सचिव
जिल्हा एकात्मिक आरोग्य व
कुटुंबकल्याण सोसायटी, सिंधुदुर्ग
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner